## <u>रेग्युलर दिवाणी दावा क्रमांक ६७/२०२१ मधील अर्ज</u>
## <u>(निशाणी क्रमांक ३०) वरील आदेश</u>

(सीएनआर क्र.एमएचएएच०८-०००११४-२०२१)

०१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्रमांक ६ यांनी त्यांचेविरुध्द झालेला 'नो से' चा आदेश बाजुला सारून त्यांचे म्हणणे अभिलेखावर घेण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्रमांक ६ यांचे म्हणणे असे आहे की, वादीने नि. २६ चा अर्ज दाखल केलेला आहे मात्र प्रतिवादी ६ यांचा उसाच्या गळताचा हंगाम चालू होता. त्यामुळे ते वकीलांना वेळेत माहिती देउ शकले नाही. त्यामुळे म्हणणे दाखल करण्यास उशिर झाला सदरचा उशिर जाणिवपूर्वक केलेला नाही. त्यामुळे अर्ज मंजूर करण्याची विनंती त्यांनी केलेली आहे.

०२. वादींनी सदर अर्जास म्हणणे दाखल करून अर्जाचा प्रखर विरोध केलेला आहे. अर्जातील मजकूर खोटा असल्याचे तसेच संधीग्ध स्वरुपाचा असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. सबब, अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती वादींनी केलेली आहे.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षकारांतर्फे वकिलांचे म्हणणे ऐकले. प्रस्तुत दावा जाहिर ठराव तसेच निरंतर मनाई हुकुमाकरीता दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज अदयापपर्यंत पुराव्यास नेमण्यात आलेले नाही. वादीने निशाणी २६ लगत या प्रतिवादी विरुध्द प्रमाणीत नकला हजर करण्याबाबत आदेश व्हावा म्हणून अर्ज दाखल केले आहे. प्रतिवादी क्र. ६ विरुध्द मागिल तारखेस नो से चा आदेश झालेला आहे. त्यानंतर लगेचच प्रतिवादी क्र. ६ ने प्रस्तुत अर्ज दाखल करुन सोबत निशाणी २६ च्या अर्जावर म्हणणे देखील दाखल केलेले आहे. प्रतिवादी क्र. ६ साखर कारखान्याचे प्रतिनिधित्व करतात त्यांनी अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तिक वाटते. सबब प्रतिवादी क्र. ६ यांस संधी देणे आवश्यक आहे. अन्यथा प्रतिवादी क्र. ६ यांस म्हणणे मांडता येणार नाही. सबब अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :-

### <u>आ दे श</u>

०१. प्रस्तुत अर्ज (नि.क्र.३०) मंजुर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी क्रमांक ६ विरुध्द झालेला निशाणी २६ वरील आदेश रद्द करण्यात येत आहे व त्यांचे म्हणणे स्वीकारण्यात येत आहे.

MANSOOR MAHAMOOD SHAIKH

Digitally signed by MANSOOR MAHAMOOD SHAIKH
Date: 2022.07.22 11:20:04 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- २१.०७.२०२२.

(एम. एम. शेख)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.